# महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ बैठकीचे इतिवृत्त दि. १०/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | सरळ सेवा भरतीमधील अनुशेष भरुन काढणेबाबत | राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक निवडीसाठी पारदर्शकता यावी यासाठी 'पवित्र' ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवारांकडून स्थानिक स्वराज्य संस्थामधील व खाजगी शिक्षण संस्थामधील शिक्षण सेवकांच्या रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सद्यस्थितीत शिक्षकेतर भरतीबाबतचा आकृतीबंध शासनस्तरावर प्रलंबित असून आकृतीबंध निश्चित होताच शिक्षकेतर भरतीबाबत शासनस्तरावरुन सूचना प्राप्त होताच कार्यवाही सुरु करणेत येईल. | शासन स्तरावर | -- |
| २ | शासन धोरणानुसार पदोन्नतीमध्ये आरक्षणास स्थगिती असताना सदर रिक्त आरक्षण जागेवर नेमणूक केलेल्या प्रस्तावांना आपले कार्यालयाने मान्यता दिलेल्या आहेत काय? असलेस कोणत्या नियमानुसार ? | | | |
| ३ | पदोन्नती मधील नियुक्तिबाबत. | आरक्षणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मागासवर्गीयांच्या पदोन्नत्तीबाबत पदे आरक्षित ठेवून खुल्या प्रवर्गामध्ये नियुक्ती देणे अपेक्षित असताना बऱ्याच संस्थाकडून अशी कार्यवाही झालेली नाही. आरक्षणाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अशा दिलेल्या पदोन्नत्या रद्द करण्यात याव्यात अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी पदोन्नतीच्या नियुक्त्यांबाबत मागासवर्गीय कक्षाने तपासलेले बिंदुनामावली तपासून पदोन्नतीबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच आरक्षित पदांवर अशा काही पदोन्नत्या देण्यात आल्या असतील तर शिक्षणाधिकारी यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४ | अनुकंपा नियुक्तिबाबत | अनुकंपा नियुक्तीबाबत फक्त शिक्षक पदावर मान्यता देण्यात येऊ शकते. शिक्षकेतर आकृतीबंधाबाबत शासन निर्णय दि.२८/०१/२०१९ नुसार तरतुदी उपलब्ध झाल्या आहेत. तथापि, वर्ग 'ड' बाबत अजूनही धोरण निश्चित झालेले नाही. शासन स्तरावरुन नियुक्तीबाबत सूचना प्राप्त होताच कार्यवही सुरु करणेत येईल. | शासन स्तरावर | -- |
| ५ | शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अनुकंपा नियुक्तीबाबत. | शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अनुकंपा नियुक्तीबाबत प्रकरणे सद्या प्रलंबित नाहीत. | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मागासवर्गीय रिक्त पदांची माहिती पुरविण्याबाबत. | संघटनेकडून शासन निर्णय दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे नमूद करण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी जिल्हास्तरावर शासन निर्णय दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ प्रमाणे कार्यवाही करावी. यासाठी आपल्या जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थाकडून मागासवर्गीय रिक्त पदांची माहिती संकलित करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ७ | दि. ०३/१२/१९८० च्या शासन आदेशानुसार कार्यकारी पदावर मागासवर्गीयांची नियुक्ती करण्याबाबत. | दि. ०३/१२/१९८० च्या शासन आदेशानुसार शिक्षण उपसंचालक कार्यालय स्तरावरील आस्थापनेच्या कार्यकारी पदावर मागासवर्गीयांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.<br>याबाबत पूढील बैठकीत चर्चा करण्यात येईल असे ठरले. | -- | -- |
| ८ | मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्यावर अन्याय अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत. | याबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | -- | -- |
| ९ | मागासवर्गीय गोपनीय अहवाल जाणीवपूर्वक खराब न करणेबाबत. | मागासवर्गीय गोपनीय अहवाल जाणीवपूर्वक खराब न करणेबाबत शिक्षण उपसंचालक कार्यालयास्तरुन पत्र निर्गमित व्हावे अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली.<br>याबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांना पत्राद्वारे योग्य ती सूचना निर्गमित करण्यात येईल. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| १० | परराज्यातील मागासवर्गीय महाराष्ट्रात मागसवर्गीय सवलतीस पात्र नसताना सवलती देवून अनियमितता केले बाबत. | परराज्यातील मागासवर्गीय उमेदवार हा महाराष्ट्रामध्ये मागसवर्गीयांसाठी मिळणाऱ्या सवलतीस पात्र ठरु शकत नाही. परराज्यातील मागासवर्गीय उमेदवारांची सरळसेवेमध्ये अथवा पदोन्नतीमध्ये खुल्या प्रवर्गातून नियुक्ती होणे अपेक्षित आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यामध्ये अशी प्रकरणे असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. कोल्हापूर व सांगली यांनी अशा प्रकरणांची तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करुन शिक्षण उपसंचालक कार्यालयास अहवाल सादर करावा. | शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. कोल्हापूर व सांगली | -- |
| ११ | आपले कार्यालयाने खाजगी अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर करणेच्या अटीवर मान्यता दिलेल्या आहेत काय? असल्यास किती ? दिली असल्यास किती कर्मचाऱ्यांनी जात वैधता | खाजगी अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर करणेच्या अटीवर मान्यता दिल्या जातात. परंतु उमेदवारांकडून मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात येत नाही.<br>शिक्षणाधिकारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याात सादर | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र सादर केले ? याबाबत आपले कार्यालयाने काय कार्यवाही केली आहे? | करण्याच्या अटीवर अशा किती मान्यता दिल्या आहेत याचा आढावा घ्यावा. मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारांकडून खुलासे मागविण्यात यावेत व जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवारांच्या बाबतीमध्ये शासन नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई करावी. | | |
| १२ | रिट याचिका क्र.७७७/२०१४ मध्ये दि. २३ सप्टेंबर २०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने अंतिम निकालानुसार आपल्या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली आहे? | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. कोल्हापूर यांचे कार्यालयाकडील प्रकरण आहे.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. कोल्हापूर यांनी याबाबत मा. उच्च न्यायालयाने अंतिम निकालानुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.कोल्हापूर | -- |
| १३ | रिट याचिका क्र. २७७९/२०१५, २१५१/२०१५, २७८१/२०१५ मध्ये आपले कार्यालयाने कोणती कार्यवाही केली? | -- | -- | -- |
| १४ | खुल्या प्रवर्गातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांना मागासवर्गीयांच्या आरक्षीत जागेवर समायोजन केलेबाबत मा. शिक्षण संचालक, पुणे यांचे पत्रावर कोणती कार्यवाही केली? (श्रीराम हायस्कूल कोवाड, ता. चंदगड, जि.कोल्हापूर बहिरेश्वर माध्यमिक विद्यालय) | शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. कोल्हापूर यांना नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.कोल्हापूर | -- |
| १५ | व्यंकटराव हायस्कूल इचरकरंजी या शाळेच्या आपले कार्यालयाकडून जाहिरात परवानगी घेतलेली नाही. विषयाची गरज नसताना पदभरती केली. त्यास आपल्या कार्यालयाने कोणत्या आधारे मान्यता दिली ? (विश्वनाथ माळी) | -- | -- | -- |
| १६ | दि. न्यु. एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर या संस्थेची बिंदू नामावली मा.सहा. आयुक्त (मावक) पुणे यांचे दि. २३/०२/२०१७ चे पत्रावर आपले कार्यालयाने कोणती कार्यवाही ठेवली आहे? ठेवली नसलेय कारण काय? | या प्रकरणी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून प्रशासन अधिकरी, मनपा, कोल्हापूर यांना अहवाल सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. अद्याप अहवाल अप्राप्त आहे. | प्रशासन अधिकारी, मनपा, कोल्हापूर | -- |
| १७ | मा. आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे दि. २३/०२/२०१७ चे पत्रावर आपले कार्यालयाने कोणती | संघटनेने दि. २३/०२/२०१७ च्या पत्राची प्रत शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावी. | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यवाही केली आहे? केली नसल्यास त्याचे कारण काय? | | | |
| १८ | शासन परिपत्रक दि. ३ मे २०१९ नुसार सेवाज्येष्ठता तयार करुन पदोन्नती मुख्याध्यापकांना दिलेल्या प्रस्तावांना आपले कार्यालयाने पदोन्नती दिलेल्या आहेत काय? सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आपलेकडून असे आदेश निर्गमित झालेले आहेत काय? सदर आदेश निर्गमित झालेले आहेत काय? दिलेल्या पदोन्नत्या किती? | सर्व शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय दि. ३ मे २०१९ नुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| १९ | श्री. आटूगडे आर.आर.यांचे शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार असताना दिलेल्या अनियमित मान्यताबाबत. | अनियमित मान्यताबाबत श्री. आटूगडे आर.आर. यांचेवर शासन स्तरावरुन कारवाई सुरु आहे. | शासन स्तरावर | -- |
| २० | श्री. विजय किसन सपकाळ न्यू इंग्लिश स्कूल, ता. पाटण, जि.सातारा यांच्या बेकायदेशीर मान्यतेची चौकशी करणेबाबत. | श्री. विजय किसन सपकाळ न्यू इंग्लिश स्कूल, ता. पाटण, जि.सातारा यांच्या बेकायदेशीर मान्यतेची शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. सातारा यांनी चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प.सातारा | -- |
| २१ | संस्था अंतर्गत शालेय तपासणी न करणेबाबत. | -- | -- | -- |
| २२ | सौ. भाग्यश्री भाग्यवंत सहा. शिक्षिका यांचे पदोन्नतीबाबत. | प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. | -- | -- |
| २३ | दि. २ मे २०१२ नंतर ना हरकत प्रमाणपत्र न घेता नियुक्त केलेल्या शिक्षकांना संवर्ग बदलून किती मान्यता देण्यात आलेल्या आहेत काय? असलेस कोणत्या नियमानुसार व किती मान्यता दिलेल्या आहेत? | दि. २ मे २०१२ नंतर ना हरकत प्रमाणपत्र न घेता नियुक्त केलेल्या शिक्षकांना संवर्ग बदलून मान्यता दिलेल्या प्रकरणांची माहिती संघटनेस उपलब्ध करुन द्यावी. | शिक्षण उपसंचालक कार्यालय | -- |
| २४ | महाराष्ट्र शासनाने परिपत्रक दि.३ मे २०१९ चे परिपत्रकाची अंमलबजावणी आपले क्षेत्रीय अधिकारी काटेकोरपणे करत नसलेबाबत. (राशिवडे, गोविंदराव हायस्कूल, इंचलकरंजी, अंतरभारतीय शिक्षण मंडळ, कोल्हापूर) | सर्व शिक्षणाधिकारी यांनी शासन परिपत्रक दि. ३ मे २०१९ नुसार कार्यवाही करण्याबाबत आपल्या जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था/शाळा मुख्याध्यापक यांना सूचना नर्गमित कराव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ➢ | **सर्वसाधारण सूचना** | | | |
| ■ | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठका पुढे आयोजित करण्यात येईल. | संघटना स्तरावर | -- |

(सत्यवान सोनवणे)
**शिक्षण उपसंचालक**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**